राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सातारा

जिल्हा आरोग्य अधिकारी
दुरध्वनी क्रमांक:- ०२१६२-२३३०२५
पत्ता:- खोली क्र ८ पहीला मजला,
जिल्हा परिषद, सातारा.
Email id - dhozpsatara@gmail.com

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
दुरध्वनी क्रमांक:- ०२१६२-२३५९४८
पत्ता:- खोली क्र १०२ तळमजला,
जिल्हा परिषद, सातारा.
Email id - dpm1.satara@gmail.com

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सातारा.

Outward No : NHM/CHO समुपदेशन/ /2021 Date : 11/02/2021

# <u>जाहिर निवेदन</u>

**विषय - समुदाय आरोग्य अधिकारी प्रवेश परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना प्रशिक्षण केंद्र वाटप करणेकरिता समुपदेशन प्रक्रिया सोमवार दि.१५/०२/२०२१ रोजी असलेबाबत**

संदर्भ- मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र दि. ०१/०२/२०२१

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये समुदाय आरोग्य अधिकारी प्रवेश परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना सुचित करणेत येते की, सदर समुपदेशनाने प्रशिक्षण केंद्र वाटप करणेची प्रकिया **सोमवार दि. १५/०२/२०२१ रोजी जिल्हा परिषद सातारा** येथे राबविणेत येणार आहे. त्याकरिता पात्र उमेदवारांनी स्वत: <u>मुळ कागदपत्रे व छायांकित प्रतिचा एक संच</u> या सह वेळेवर उपस्थित रहावे. उमेदवारांनी प्रवेश परिक्षेतील प्रवेशपत्र व स्वत:चे ओळखपत्र सादर करणे अनिवार्य राहिला.

तसेच सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील (SEBC) उमेदवारांना जर आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (EWS) लाभ घ्यावयचा असल्यास त्यांना समुपदेशन प्रक्रियेपुर्वी किंवा समुपदेशनांच्या दिवशी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच इतर आवश्यक सुचना उमेदवारांनी अर्ज भरताना सादर केलेल्या ई- मेल वर जिल्हा परिषद सातारा द्वारे पाठविणेत आलेल्या आहेत.

सदर समुपदेशन प्रक्रियेकरिता वेळेवर न येणाऱ्या, अनुपस्थित राहणा-या उमेदवारांना या प्रक्रियेतून बाद करण्यात येईल व त्यांची कुठल्याही प्रकारची तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवारांनी मेरिट लिस्टमध्ये नावामध्ये बदल आडनावामध्ये बदल जात व प्रवर्गामध्ये बदल इ. बाबत हरकत असल्यास समुपदेशनाच्या दिवशी मुळ कागदपत्रे पडताळणी दरम्यान कळविणेत यावी.

कोविड १९ साथरोग असल्यामुळे समुपदेशनावेळी उमेदवाराने मास्क व सॅनिटायझरचा वापर करणे, तसेच सोशल डिस्टंसिंगचे पालन करणे अनिवार्य राहील.

समुपदेशनासाठी उमेदवारांना स्वत: उपस्थित असणे बंधनकारक राहील. उमेदवार सोडुन इतर कोणासही लेखी पुर्व परवानगी शिवाय उपस्थित राहता येणार नाही.

**उमेदवारांची मेरिट लिस्ट** www.zpsatara.gov.in **या वेबसाईट वर दि. ०५/०२/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे.**

**स्थळ- छत्रपती शिवाजी सभागृह, चौथा मजला, जिल्हा परिषद सातारा.**

**वेळ- सकाळी ९.०० ते सांयकाळी ४.०० वा. पर्यत**

**दिनांक- १५/०२/२०२१**

सदस्य सचिव
समुपदेशन समिती तथा
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
जिल्हा परिषद सातारा

अध्यक्ष
समुपदेशन समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सातारा